लोकमत

# विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील परीक्षा सुरळीत

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सोमवारी एकूण ३४ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालये तसेच अधिविभागांमध्ये सुरळीतपणे पार पडल्या.

बीए, बीकॉम, बीएस्सी, बीई, बीसीए, बीएसडब्ल्यू, बीटेक, बीफार्म, बीआर्च, बीएड्, एमए, एमसीए, एमएसएस्सीच्या एकूण ३४ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालये व अधिविभागामध्ये सुरळीतपणे पार पडल्या. शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा २ जानेवारीपासून सुरू झालेल्या आहेत.

या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. या पथकाकडून परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर परीक्षा प्रमाद समितीमार्फत नियमानुसार कारवाई विद्यापीठाकडून करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंग जाधव यांनी केले आहे.

पुढारी

# विद्यापीठ हिवाळी सत्राच्या पदवी, पदव्युत्तर ३४ अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ हिवाळी सत्रांतर्गत ३४ अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरळीत पार पडल्या आहेत. विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर-२०२२ हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा २ जानेवारीपासून सुरू झाल्या आहेत. सोमवारी बी.कॉम.,बीए., बी.टेक., बीसीए., बी.फार्मसी, मास्टर ऑफ लॉ, बी. आर्किटेक्ट, एमसीए, बीई, बीआयडी, एमएस्सी. (टेक्नॉलॉजी), बी.व्होक. (टुरिझम सर्व्हिस) अशा ३४ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने संलग्नित महाविद्यालये, विद्यापीठ अधिविभागांमध्ये झाल्या अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

पुढारी

# कमला कॉलेजच्या चार खेळाडूंची निवड

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठ संघात कमला कॉलेजमधील बी. ए. भाग १ च्या आर्या मोरे, समृद्धी कटकोळे, सानिका पाटील, समीक्षा पोवार या चार खेळाडूंची निवड झाली होती. ग्वाल्हेर (मध्य प्रदेश) येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत आर्या मोरे हिने बेस्ट डिफेंडरचा मान पटकाविला. सर्वांना संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील, प्राचार्य डॉ. तेजस्विनी मुडेकर, प्रशिक्षक रघू पाटील, प्रा. ज्योती गांवडे, पूजा ठाकूर यांचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी

# आजरा महाविद्यालयाचा खेळाडू सिद्धांत पुजारीला कांस्य पदक



**कोल्हापूर :** आजरा महाविद्यालयाचा आंतरराष्ट्रीय खेळाडू सिद्धांत पुजारी याने मंगळूर येथे झालेल्या पश्चिम विभागीय राष्ट्रीय स्पर्धेत कांस्य पदकाची कमाई केली. ३ हजार मिटर स्टीपल चेस प्रकारात त्याने हे यश मिळविले. त्याची निवड अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेसाठी झाली आहे. सिद्धांतने आंतर - विभागीय शिवाजी विद्यापीठ स्पर्धेत सुवर्ण व पुणे येथे झालेल्या मिनी ऑलिम्पिक स्पर्धेत कांस्य पदक पटकाविले आहे. त्याला संस्थेचे अध्यक्ष अशोक चराटी, डॉ. अनिल देशपांडे, रमेश कुरुनकर, डॉ. दीपक सातोस्कर, प्राचार्य डॉ. अशोक सादले, उपप्राचार्य दिलीप संकपाळ डॉ. धनंजय पाटील, अल्बर्ट फर्नांडिस आदींचे मार्गदर्शन लाभले.